| MHKO160003922015 | रे.क.नं.७७/२०१५ मधील नि. ५ खालील आदेश |
|---|---|

१. वादीं यांनी प्रस्तुतचा अर्ज, सोबतचे प्रतिज्ञापत्र, दिवाणी प्रक्रीया संहिता, १९०८ चा नियम ३९, आदेश १,२ अन्वये प्रतिवादीं विरूध्द तूर्तातूर्त मनाई मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादींनी मिळकतींचे वर्णन परिच्छेद १ मध्ये सविस्तर नमूद केलेले आहे, त्या मिळकतींना यापुढे दावा मिळकतीं असे संबोधण्यात येत आहे.

२. वादीं यांचे अर्जाची थोडक्यात हकिकत अशी की,

दावा मिळकतीं या वादीं व यशवंत केदारी पाटील यांच्या सामाईक वडिलार्जित मालकी वहिवाटीच्या मिळकतीं आहेत. त्यांच्यामध्ये आजपर्यंत कोणत्याही प्रकारे सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. यशवंत यांचा मरेपर्यंत सांभाळ वादीं यांनी केलेला आहे. यशवंत हे सन २००४ साली निपुत्रिक मयत झाले. मौजे गावडी येथे मयत यशवंत यांच्या नावे खाते क्र.१२० हे नमूद असून त्या खात्यावरील संपूर्ण गट नंबरमधील असणारे क्षेत्र व वादी यांचे क्षेत्र यामध्ये वादीं व त्याची मुले कष्टमशागत करून वेगवेगळी पिके घेतात. प्रतिवादी क्र. १ ही उच्च शिक्षीत असून तिच्या नोकरीच्या पदाचा व सरकारी कार्यालयातील ओळखीचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी क्र. २ हीचे नावे मे. कार्यकारी दंडाधिकारी, शाहुवाडी यांचेसमोर दि.०५/०७/२०१४ रोजी खोट्या आशयाचे प्रतिज्ञापत्र तयार केले. त्या आधारे तलाठी, माजरे यांचेकडे प्रतिवादी क्र. २ ही अज्ञात व्यक्ती मयत यशवंत यांची वारस असल्याचे भासवले. तसेच प्रतिवादी क्र.२ हिचे नाव मयत यशवंत यांचे सरळ वारस म्हणून संपूर्ण महसूल दप्तरी दावा मिळकतीं गिळंकृत करण्यासाठी नोंद करण्यासाठी भाग पाडले. सदरचा अर्ज यातील प्रतिवादी क्र २ हीचे सहीने दि.०५/०६/२०१४ रोजी दाखल केला. त्या आधारे दि.१५/०१/२०१५ रोजी प्रतिवादी क्र २ हीचे नावे फेरफार क्र ४२४ हा मंजूर करून वारस ठराव १२६ प्रमाणे प्रतिवादी क्र २ ही मयत यशवंत केदारी पाटील यांचे वारस असताना तिचे नाव दावा मिळकतींच्या व मयत यशवंत यांच्या नावे असणारे अन्य मिळकतींच्या ७/१२ पत्रकी प्रतिवादी क्र १ व २ यांच्या संगणमताने नोंद केले. त्यानंतर सदर खोट्या ७/१२ पत्रकी केलेल्या नोंदीच्या आधारे प्रतिवादी क्र १ व २ यांनी संगणमत करून

विनाअधिकार दावा मिळकतींचे घाईगडबडीने दि.१८/०२/२०१५ रोजी दस्त क्र. ३०३/२०१५ ने खरेदीपत्र नोंदविले आहे. प्रतिवादी क्र २ ही मयत यशवंत पाटील यांची पत्नी असलेबाबत कोणताही पुरावा नाही. प्रतिवादी क्र २ हीचा मयत यशवंत यांच्याशी केव्हाही विवाह झालेला नव्हता व नाही. प्रतिवादी क्र २ हीचा यशवंत यांच्या घराण्याशी कोणताही संबंध नाही. मयत यशवंत यांचा मृत्यू सन २००४ साली झाला. तेव्हापासून ते जून २०१४ पर्यंत प्रतिवादी क्र २ ही दावा मिळकतींत हक्क किंवा अधिकार सांगण्यास कधीही आलेली नाही. वादींच्या अपरोक्ष प्रतिवादी क्र २ हीने दावा मिळकतींचे ७/१२ पत्रकी आपली नावे लावून दावा मिळकतीं प्रतिवादी क्र १ ला सदर खरेदीपत्राच्या आधारे विक्री केलेली आहे. परंतु दावा मिळकतींमध्ये वादींचा ताबा व कब्जेवहिवाट आहे. सदर खरेदीपत्राच्या आधारे प्रतिवादीं हे वादींच्या दावा मिळकतींस हरकत अडथळा करू लागल्यामुळे वादींनी सदरचा दावा दाखल करून त्यामध्ये तात्पुरत्या मनाईचा आदेश होण्याची विनंती वादींनी केली आहे.

३. प्रतिवादी क्र १ हीने तिची लेखी कैफियत नि.२४ वर दाखल करून दाव्यातील मजकुर नाकारलेला आहे. दावा मिळकतींचे वर्णन व नंबर चुकीचे असल्याचे नमूद केले आहे. वादींनी खोटी वंशावळ नमूद केलेली आहे. सदर प्रतिवादींनी तिचे लेखी कैफियतीमध्ये वंशावळ नमूद केलेली आहे. सदर प्रतिवादीने पुढे असे कथन केले की दावा मिळकतीं या प्रतिवादी क्र २ व मयत यशवंत पाटील यांचे वडिलार्जित स्वतंत्र मालकी कब्जेवहिवाटीच्या मिळकतीं होत्या. यशवंत हे सन २००४ मध्यें मयत झालेनंतर प्रतिवादी क्र २ ही त्यांची कायदेशीर व सरळ वारस आहे. तसेच त्या नात्याने जमीन गट क्र २९०, २९२ व इतर जमीनीं मालक या नात्याने तिच्या कब्जेवहीवाटीस होत्या. प्रतिवादी क्र १ हीने सदर गट नंबरच्या कागदपत्रांची सखोल चौकशी करून प्रतिवादी क्र २ कडून रजिस्टर्ड दस्त क्र ३०३/२०१५ नुसार दावा मिळकतीं खरेदी केल्या आहेत. तसेच बाजारभावाप्रमाणे रू.४,५५,०००/- प्रतिवादी क्र २ ला दिले. तेव्हापासून प्रतिवादी क्र १ ही मालक या नात्याने सदर मिळकतींमध्ये कब्जेवहिवाट करून वेगवेगळी पिके घेत आहे. मयत यशवंत व त्याचे भाऊ यांच्यामध्ये त्यांचे वडिलोपार्जित जमिनीचे वाटप होऊन मौजे गावडी येथील गट क्र २९०, २९२ व इतर जमींनी या मिळकतीं मयत यशवंत यांच्या वाटपास आलेल्या आहेत. तेव्हापासून सदर जमिनींवर मयत यशवंत यांच्या नावाची नोंद आहे. सदर खरेदीपत्रानुसार गट क्र २९०, २९२ च्या ७/१२ व ८अ पत्रकी प्रतिवादी क्र १ हीचे नावाची नोंद झालेली आहे,

त्याप्रमाणे डायरी ४२४ व ४३० झालेल्या आहेत. त्या डाय-या वादींनी कधीही आव्हानित केलेल्या नाहीत. प्रतिवादी क्र १ ने योग्य खात्री करूनच प्रतिवादी क्र २ कडून सदर दावा मिळकतीं खरेदी केलेल्या आहेत व प्रतिवादी क्र १ चा दावा मिळकतींमध्ये ताबा असून सदर अर्जाच्या आधारे सदर प्रतिवादींचा ताबा काढून घेण्याचा प्रयत्न वादीं करीत आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ने सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. प्रतिवादी क्र २ ने तिची लेखी कैफियत नि.४५ वर दाखल करून त्यामध्ये जवळपास प्रतिवादी क्र १ प्रमाणे कथन केले आहे. तिने कथन केले की मयत यशवंत व तिचा साखरपुडा दि.१५/०४/१९६६ रोजी झाला, तसेच त्यांचा विवाह दि.२१/०४/१९६६ रोजी पन्नास लोकांच्या उपस्थितीत हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे संपन्न झाला. प्रतिवादी क्र २ हीचे माहेरचे नाव ताईबाई असून लग्नानंतर तिचे नाव लक्ष्मी असे ठेवलेले आहे. लग्नानंतर यशवंत व प्रतिवादी क्र २ म्हणजे ताईबाई उर्फ लक्ष्मी हे पतीपत्नीप्रमाणे एकत्रित राहू लागले. तसेच यशवंत मयत होईपर्यंत ते एकत्रात राहीले. यशवंत यांना दावा मिळकतीं व इतर मिळकतीं वाटपात मिळालेल्या आहेत. यशवंतच्या मृत्यूनंतर प्रतिवादी क्र २ याच मयत यशवंतच्या कायदेशीर व सरळ वारस आहेत. त्याप्रमाणे त्या गट नं २९०,२९१ व इतर मिळकतींत मालक या नात्याने प्रतिवादी क्र.२ हया कब्जेवहिवाट करीत आहेत. वादींचा सदर मिळकतींशी कोणताही हक्क व अधिकार नाही. त्यानंतर सदर प्रतिवादी क्र २ ने प्रतिवादी क्र १ यांना दावा मिळकतींचे रजिस्टर्ड खरेदीपत्र करून दिलेले आहे व तेव्हापासून प्रतिवादी क्र २ ने जमीन गट क्र २९०, २९२ चा कब्जा प्रतिवादी क्र १ ला दिलेला आहे. वादीं यांनी त्यांचे गट नं ११३ मधील क्षेत्र प्रतिवादी क्र १ हीचे पतीस दि.२५/०६/२०१४ रोजी विकलेले आहे. तसेच प्रतिवादी क्र २ हीने गट नं.२३६, २३८, २४४, ३११, ३१५ या मिळकतींतील प्रतिवादी क्र २ हीचे हिश्याच्या मिळकतीं काही लोकांना विकलेल्या आहेत. वादीं स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आलेले नाहीत, त्यामुळे त्यांनी वादींचा सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. मी वादीं, प्रतिवादीं यांचे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अभिलेखावरील वादकथन, दाखल कागदपत्रे यांचे अवलोकन केले आहे. वादीं, प्रतिवादीं यांचे परस्परविरोधी वादकथन, अभिलेखावरील कागदपत्रे, युक्तीवाद या सर्व घटनांवरून प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्यासाठी खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत. मी सदर मुद्दयांचा निश्कर्ष कारणमिमांसेसह

नमूद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी केस वादीं यांचे बाजूने आहे का ? | होकारार्थी. |
| २. | सोईस्कर्तेचा तूला वादीं यांचे बाजूने आहे का? | होकारार्थी. |
| ३. | तूर्तातूर्त मनाई न दिल्यास वादीं यांचे नुकसान होणार आहे का ? | होकारार्थी. |
| ४. | आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे |

## कारणमिमांसा -

## मुद्दा क्र. १ ते ३ करीता -

६. दोन्ही बाजुंच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादींनी नि. ३, नि. ५१ लगत कागदपत्रें दाखल केलेली आहेत. प्रतिवादी क्र १ यांनी नि.१९, नि.४६, नि.५९ लगत तर प्रतिवादी क्र २ यांनी नि.४९ लगत कागदपत्रें दाखल केलेली आहेत. वादीं यांनी त्यांचेतर्फे साक्षीदार धोंडिराम पाटील यांचे शपथपत्र नि.५२ वर व साक्षीदार मारूती कांबळे यांचे शपथपत्र नि.५३ वर दाखल केले.

७. दोन्ही पक्षकारांचा विस्तृत युक्तिवाद ऐकल्यानंतर व कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर असे दिसते की, प्रतिवादी क्र १ हीने नि.१९ सोबत फेरफार क्र ४२४ चा डायरी उतारा दाखल केलेला आहे. त्यामध्ये यशवंत केदारी पाटील हे सन १९/११/१९८४ रोजी मयत झाल्याचे कथन केले आहे. तसेच त्या फेरफार उता-यामध्ये ताईबाई यशवंत पाटील हीचे नाव नमूद झालेले आहे. पण यशवंत केदारी पाटील हे दि.१९/११/२००४ मध्ये मयत झाल्याचे प्रतिवादी क्र १ व २ यांनी त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये कथन केलेले आहे. तसेच वादींनी दाखल केलेल्या मृत्यू प्रमाणपत्रावरून यशवंत हे दि.१९/११/२००४ रोजी मयत झाल्याचे दिसते. तसेच प्रतिवादी क्र १ ने नि.१९ सोबत दाखल केलेल्या मृत्यूपत्रावरून मयत यशवंत हे दि.१९/११/२००४ रोजी मयत झाल्याचे स्पष्ट होत आहे. यावरून स्पष्ट दिसते की सदरचा फेरफार हा चुकीच्या पध्दतीने तयार करण्यात आलेचे प्राथमिकतः दिसत आहे. मयत यशवंत यांच्या मृत्यूच्या तारखेमध्ये तफावत असल्याचे दिसत आहे. वादीं यांनी प्रतिवादीं यांनी नोंदविलेला दस्त क्र.३०३/२०१५ हा या दाव्यामध्ये आव्हानित केलेला आहे.

८. वादीं यांनी यशवंत व प्रतिवादी क्र २ यांच्या लग्नाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केलेले आहेत. तसेच प्रतिवादी क्र २ ही मयत यशवंत यांची कायदेशीर लग्नाची पत्नी नसल्याचे कथन केले आहे. तसेच प्रतिवादी क्र २ हीने तिचे मयत पती यशवंत सोबत लग्न झाल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी अभिलेखावर हजर केलेला नाही, त्यामुळे त्यांच्या लग्नाबाबत या क्षणी संशय निर्माण होतो. वादींनी व प्रतिवादींनी दाखल केलेल्या कागदपत्रांची सत्यता पुराव्यामध्ये सिध्द होणार आहे. यावरून एकंदरीत असे दिसते की दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींचा खरेदीपत्राआधारे कब्जा नसून प्रत्यक्ष कब्जा वादीं यांचा आहे. वादीं हे दावा मिळकतीमध्ये कब्जेवहिवाट करीत असून वेगवेगळी पिके त्यामध्ये ते घेत आहेत. त्यामुळे वादींच्या ताब्याचे संरक्षण करणे न्यायोचित होईल. मयत यशवंत यांच्या मृत्यूच्या तारखेबाबत वेगवेगळी कागदपत्रें अभिलेखावर आहेत, तसेच प्रतिवादी क्र २ ही मयत यशवंत यांची कायदेशीर पत्नी असल्याबाबत संशय निर्माण होत आहे. त्यामुळे दाखल केलेल्या कागदपत्रांवरून वादीं यांची दावा मिळकतीमध्ये कब्जेवहिवाट असल्याचे दिसते. तसेच वादीं यांनी नि.५१ सोबत दावा मिळकतीच्या कर पावत्या, कुंभी कासारी कारखान्यास गळितात घेतलेल्या उसाच्या पावत्या हजर केल्या आहेत. तसेच पाणीपट्टीच्या पावत्या व दोन साक्षीदारांचे शपथपत्र हजर केले आहे. यावरून असे दिसते की दावा मिळकतीमध्ये आजरोजी वादीं यांचा ताबा असून त्याचे संरक्षण करणे न्यायोचित होणार आहे.

९. प्रतिवादीं यांनी सदरकामी प्रेम सिंघ व इतर वि. बिरबल व इतर AIR 2006 SUPREME COURT 3608 :: 2006 AIR SCW 3595 हे न्यायनिर्णय हजर केले आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

> “A registered document, therefore, prima facie would be valid in law. The onus of proof, thus, would be on a person who leads evidence to rebut the presumption. In the instant case, the plaintiff has not been able to rebut the sai presumption.”

१०. प्रतिवादीं यांनी सदरकामी अनिल त्रिपाठी वि. उर्मिला त्रिपाठी AIR 2016 MADHYA PRADESH 178 :: (2016) 167 ALLINDCAS 503 (MPG) हे न्यायनिर्णय हजर केले आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

"There is presumption that a registered document is validly executed. A registered document, prima facie would be valid in law. The onus of proof, thus, would be on a person who lends evidence to rebut the presumption. In the instant case, respondent has not been able to rebut the said presumption."

११. वरील दोन्ही न्यायनिर्णयांचे अवलोकन केल्यास असे दिसते की प्रतिवादींनी जरी नोंदणीकृत खरेदीपत्र केलेले असले तरीही व त्यामध्ये ताबा हा प्रतिवादींनी दिल्याचे नमूद असले तरीही दाखल केलेल्या कागदपत्रांवरून व पुराव्यावरून आजरोजी वादीं यांची दावा मिळकतींत कब्जेवहिवाट असल्याचे प्राथमिकतः सिध्द होते. त्यामुळे सदरचे दोन्ही न्यायनिवाडे प्रतिवादींस सदरकामी मदत करीत नाहीत.

१२. वादीं यांनी सदरकामी अनाथुला सुधाकर वि. पी. बुचि रेड्डी व इतर AIR 2008 SUPREME COURT 2033 हे न्यायनिर्णय हजर केले आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

"As a suit for injunction simpliciter is concerned only with possession, normally the issue of title will not be directly and substantially in issue. The prayer for injunction will be decided with reference to the finding on possession. But in cases where de jure possession has to be established on the basis of title to the property, as in the case of vacant sites, the issue of title may directly and substantially arise for consideration, as without a finding thereon, it will not be possible to decide the issue of possession"

१३. वादीं यांनी सदरकामी मुलजि शाह व इतर वि. पॅराडिसिया बिल्डर्स प्रा लिमी व इतर AIR 1998 BOMBAY 87 हे न्यायनिर्णय हजर केले आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

"The contention that in a suit for injunction based primarily

on posession, question of title cannot be gone into and therefore while considering the application for temporaty injunction the only consideration before the court was possession and not the title of plaintiff is neither impressive nor sound. In the suit for perpetual injunction the Court may be called upon to hold inquiry in title, right, interest or status, as the case may be, of the plaintiff to find out whether plaintiff is entitled to protection of his possession by decree of injunction. The same consideration, prima facie, is required to be seen while considering an application for temporary injunction. The question possession presupposes lawful possession and for adjudication of that question whether finally or at interlocutory stage, the inquiry into title, right, interest or status of plaintiff is not foreign to the subject-matter."

१४. वादीं यांनी सदरकामी निर्भयसिंग वि. शंकरलाल व इतर AIR 1985 MADHYA PRADESH (4) हे न्यायनिर्णय हजर केले आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

"Powers of appellate Court Suit for permanent injunction – Finding by trial Court after consideration of evidence that plaintiff was in possession of suit land on date of institution of suit – Appellate Court while affirming that finding referring to entries in Revenue Records and to fact that land revenue was paid by plaintiff – Judgment of appellate Court not to be held to be vitiated on ground that it failed to discuss evidence on record in detail AIR 1967 SC 1124."

१५. वादीं यांनी सदरकामी कदम सिंघ वि. मे. सी.एच.डी. डेव्हलपर्स लिमी व इतर नि.ता. ०४/०२/२००९ हे न्यायनिर्णय हजर केले आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

“In all other cases, the remedy of the co-owner out of possession of the property is to seek partition, but not an injunction restraining the co-owner in possession from Civil Revision No. 493 of 2009 (6) doing any act in exercise of his right to every inch of it which he is doing as a co-owner."

१६. वादीं यांनी सदरकामी एम. कल्लाप्पा शेट्टी वि. एम.व्ही. लक्ष्मीनारायण राव AIR 1972 SUPREME COURT 2399 हे न्यायनिर्णय हजर केले आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

“The plaintiff can on the strength of his possession visit interference from persons who have no better title than himself to the suit property. Once it is accepted, as the trial court and the first appellate court have done, that the plaintiff was in possession of the property ever since 1947 then his possession has to be protected as against interference by some one who is not proved to have a better title than himself to the suit property. On the findings arrived at by the fact finding courts as regards possession, the plaintiff was entitled to the second relief asked for by him even if he had failed to prove his title satisfactorily. Therefore in our opinion, the High Court was not right in interfering with the judgment of the trial court as affirmed by the first appellate court regarding relief No. 2.”

१७. वादीं यांनी सदरकामी मारोति जयराम कदम वि. महादू गोविंद कदम व इतर 2010(6) ALL MR 852 हे न्यायनिर्णय हजर केले आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

“Specific Relief Act (1963), Ss. 37, 38 – Injunction against obstruction – Entitlement to – Appellant in settled possession of suit land as on the date of suit – Appellant, held, entitled to

injunction against obstruction by the defendants until he is evicted by the process of law."

१८. वादीं यांनी दाखल केलेल्या वरील न्यायनिर्णयांचे अवलोकन केले असता या न्यायनिर्णयातील नमूद घटना या प्रस्तुत केसमध्ये वादीं यांचे कथनांचे पृष्ठ्यर्थ लागू पडत आहेत व ते वादी हे यांचे सदरचे केसला सहाय्यक ठरत आहेत. वादीं व मयत यशवंत यांची दावा मिळकतींमध्ये कब्जेवहिवाट होती. यशवंत मयत झाल्यानंतर सुध्दा वादींची दावा मिळकतींमध्ये कब्जेवहिवाट आजपर्यंत असल्याचे दिसते. वादींचा ताबा हा पूर्वीपासून असल्याचे दिसते, त्यामुळे त्यांचे ताब्याचे संरक्षण करणे गरजेचे आहे.

१९. एकंदरीतपणे, वादीं यांनी प्रथमदर्शनी केस सिध्द केलेली आहे. तसेच, दाव्याचा समतोल हा वादींच्या बाजूने आहे. जर तुर्तातुर्त मनाई आदेश दिला नाही तर वादीं यांचे नुकसान होईल तसेच तुर्तातूर्त मनाई आदेश दिला तर प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून वादींनी सकृतदर्शनी केस सिद्ध केल्यामुळे न्यायालय मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्रमांक ४ साठी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्ज निशाण ५ हा मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादीं अगर तर्फे इसमांनी दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत वादींचे दावा मिळकतींतील कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करू नये अथवा दावा मिळकतींचे ७/१२ पत्रकी त्यांचे लागलेल्या नावाचे आधारे दावा मिळकतीं या हस्तांतर, तबदील करू नये अथवा त्यावर त्रयस्तांचा बोजा निर्माण करू नये असा तूर्तातूर्त मनाई आदेश प्रतिवादींविरूध्द पारीत करण्यात येतो.

३. खर्चाचा आदेश दाव्याचे अंतिम आदेशावर अवलंबून राहील.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Amol Shriram Shinde
Date: 2023.03.29 11:58:40 +0530

(अमोल श्रीराम शिंदे )
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
शाहुवाडी मलकापूर

स्थळ- शाहुवाडी
दि. २८/०३/२०२३